UMRAO HOSPITALS

MULTI-SPECIALTY, TERTIARY CARE HOSPITAL

# उमराव हॉस्पीटल्सची मिरा-भायंदर वासियांसाठी किफायतशीर दरात जागतिक दर्जाची आरोग्यसेवा

- केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याणमंत्री गुलाम नबी आझाद यांच्या हस्ते हॉस्पीटलचे उद्घाटन
- महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते उमराव कॉलेज ऑफ नर्सिंग एज्युकेशन आणि अस्मिता कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचा पायाभरणी सोहळा संपन्न.
- मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि अखिल भारतीय काँग्रेस समितीचे महासचिव दिग्विजच सिंग यांच्या हस्ते उमराव इंस्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्स अँड रीसर्च ट्रस्टचे अध्यक्ष सय्यद नझर हुसेन यांचे दंतकथासदृष्य जीवन आणि कर्तबगारीवर आधारित ''सय्यद नझर हुसेन - मॅन विथ अ मिशन'' पुस्तकाचे अनावरण.

**१ नोव्हेंबर २०१०:** मुंबई - अस्मिता समुहाचे मिारा-भायंदरस्थित ३३० बेडसह विविध प्रकारच्या खास वैद्यकीय सेवा पुरवणारे अत्याधुनिक रुग्णालय 'उमराव हॉस्पीटलचे' केंद्रीय आरोग्य व कुटुंबकल्याणमंत्री गुलाम नबी आझाद यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. मिरा-भायंदर परिसरात आधुनिक वैद्यकीय सेवा सुविधा पुरविणारे हे पहिलेच रुग्णालय आहे. बोरीवली ते वापी दरम्यानच्या पश्चिम उपनगरातील रहिवाशांना उत्तम दर्जाच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्याच्या उद्देशानेच हे रुग्णालय उभारण्यात आले आहे.

उद्घाटन सोहळा अविस्मरणीय करतांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते उमराव कॉलेज ऑफ नर्सिंग एज्युकेशन अँड अस्मिता कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचा पायाभरणी समारंभ संपन्न करण्यात आला. तसेच, मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्रे दिग्विजय सिंग आणि अखिल भारतीय काँग्रेस समितीचे महासचिव दिग्विजय सिंग यांच्या हस्ते 'द उमराव इंस्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्स अँड रीसर्च ट्रस्ट'चे अध्यक्ष सय्यद नझर हुसेन यांची कर्तबगारी आणि जीवनावर लिहिण्यात आलेल्या पुस्तकोच प्रकाशन करण्यात आले.

उमराव हॉस्पीटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र शर्मा या प्रसंगी म्हणाले, '' आणिबाणी सुश्रृषा प्रसंगी रुग्ण वाचण्याची शक्यता असलेल्या सोनेरी काळात रुग्णांना विविध प्रकारच्या खास सेवासुविधा उपलब्ध करुन

देणे हे उमराव हॉस्पीटलचे उद्दीष्ट आहे. रुग्णालयातील रुग्णांसाठीच्या अनेक प्रकारच्या सेवांना अत्याधुनिक पायाभूत सुविधांचा आधार देण्यात आला आहे.''

उमराव हॉस्पीटल्सचे अध्यक्ष मुझफ्फर हुसेन या प्रसंगी म्हणाले, '' मिरा-भायंदर परिसरात अशा पध्दतीच्या मोठ्या रुग्णालयाची उणीव भासत होती. गेल्या अनेक वर्षांपासून या भागातील लोकसंख्या अनेकपटीने वाढली आहे. पण आधुनिक पध्दतीचे खास आणि विविध वैद्यकीय उपचार तसेच सेवा सुविधा असलेल्या रुग्णालयाची मात्र येथे चणचण भासत होती. अनेक पिढ्यांपासून येथील लोक वैद्यकीय उपचारांसाठी मुंबईकडे धांव घेत आहेत. म्हणूनच आपुलकीने सर्वोत्तम वैद्यकीय सेवा पुरविणाच्या तसेच किफायतशीर दरात जागतिक स्तराच्या सेवा देणाच्या उद्देशाने हे रुग्णालय बांधण्यात आले आहे.''

रुग्णालयाच्या विकास योजनेवर अधिक प्रकाश टाकतांना ते पुढे म्हणाले, '' नर्सिंग कॉलेज आणि निमवैद्यकीय सेवांचे कॉलेज स्थापन करण्याची योजना आमच्याकडे तयार आहे. दिल्लीत देखील अशाच प्रकारच्या विविध व खास वैद्यकीयस सेवा पुरविणारे रुग्णालय आम्ळी उभारत आहोत. तसेच मुंबई-दिल्ली कॉरीडॉर दरम्यान अशा प्रकारची ५ ते ६ रुग्णालये उभारण्याची आमची इच्छा आहे.''

उमराव हॉस्पीटल द उमराव इंस्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्स अँड रीसर्च ट्रस्ट (टीयूआयएमएसएआर) ची देण आहे. द उमराव इंस्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्स अँड रीसर्च ट्रस्टची स्थापना १९९० साली करण्यात आली होती. समाजाला दर्जेदार जीवन देण्याच्या उद्देशाने ट्रस्टची स्थापना करण्यात आली आहे. तर उमराव हॉस्पीटल्स समाजाचे एकंदर आरोग्य सुधारण्याच्या उद्देशाने उभारण्यात आले आहे. पेशंट-रेकॉर्ड डिजिटलायझेशन व रियल टाईम वेव्हफॉर्म मॉनिटरींग ऑफ ट्रीटमेंट, एअर ॲम्ब्युलन्स आणि आयसीयु ऑन व्हील्स सारक्ष्या नाव्यिन्यपूर्ण सेवा मिरा-भायंदरमध्ये सर्वप्रथम उमराव रुग्णालयातर्फेच सुरु करण्यात आल्या आहेत.

**उमराव हॉस्पीटल विषयी :**

उमराव हॉस्पीटलच्या माध्यमातून अस्मिता समूह अत्याधुनिक वैद्यकीय सेवा क्षेत्रात पदर्पण करीत आहे. पायाभूत सुविधा अणि शिक्षण क्षेत्रात समुहाचे ठळक अस्तित्व आहे. उमराव हॉस्पीटल हा अस्मिता समुहाचा नवा प्रस्ताव असून समुहाच्या सामाजिक उत्तरदायित्वातून प्रगती साधण्याच्या तत्वज्ञानाची त्यातून प्रचिती येत आहे.

उमराव हॉस्पीटल मिरा-भायंदर क्षेत्रात उभे होणारे विविध प्रकारच्या व्याधींवर अत्याधुनिक वैद्यकीय सेवासुविधा देणारे पहिलेच रुग्णालय आहे.

रुग्ण बरा होण्यासाठी अत्यंत पोषक वातावरण आणि सेवा उपलब्ध करण्यासाठीच या रुग्णालयाची निर्मिती करण्यात आली आहे. येत्या १नोव्हेंबर पासून रुग्णालय सुरु करण्यात येत आहे. रुग्णालयात सल्ला, निदान आणि उपचार अशा सर्व प्रकारच्या प्रमुख वैद्यकीय उपचारांची ३६० अंशातील सोय करण्यात आली आहे. तसेच जागतिक दर्जाच्या वैद्यकीय सेवा सुविधा परवडणा-या किमतीस येथे उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

**अधिक माहितीसाठी संपर्क:**

मोनिका खेमका - 9920474880

जुई जोगदंड - 9820055608